असा. क्र. ९ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, जानेवारी २०, २००५/पौष ३०, शके १९२६

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-क

महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, संचालक (दारूबंदी व उत्पादन शुल्क), जिल्हा दंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी) विनियम, २००५

अनुक्रमणिका


| अ.क्र | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १ | शीर्षक | १ |
| २ | व्याख्या | १ |
| ३ | आकारांची वसूली | ४ |
| | ३.३ वीज पुरवठा करण्यासाठी झालेल्या खर्चाची वसूली | ५ |
| | ३.४ वीज पुरवठ्याचा आकार | ७ |
| ४ | वीज पुरवठ्यासाठी अर्ज | ७ |
| ५ | अर्जाची छाननी | ९ |
| ६ | करार | ११ |
| ७ | वितरण परवानाधारकाच्या मालमत्तेची देखभाल करणे | १२ |
| ८ | ग्राहकाच्या जागेत प्रवेश | १३ |
| ९ | ग्राहकाच्या जागेचे वायरिंग करणे | १४ |
| १० | नावातील बदल | १४ |
| ११ | सुरक्षा अनामत | १५ |
| १२ | पॉवर फॅक्टर/ हार्मोनिक्स | १७ |
| १३ | वीज दराच्या वर्गीकरणानुसार ग्राहकाचे वर्गीकरण आणि पुर्नवर्गीकरण | १८ |
| १४ | मीटर्स | १८ |
| | १४.१ मीटरचा पुरवठा व किंमत | १८ |
| | १४.२ हरवलेली/ जळालेली मीटर्स | १९ |

| | | |
|---|---|---|
| | १४.३ मीटरच्या नोंदी घेणे | १९ |
| | १४.४ मीटरची तपासणी व देखभाल | १९ |
| १५ | देयके तयार करणे | २० |
| | १५.१ देयके तयार करणे आणि सादरीकरण यांतील मधला काळ | २० |
| | १५.२ देयकाचा तपशील | २० |
| | १५.३ मीटरच्या नोंदी नसताना देयके तयार करणे | २१ |
| | १५.४ मीटर सदोष असताना देयके तयार करणे | २२ |
| | १५.५ देयकांचा भरणा | २२ |
| | १५.६ आगाऊ भरणा | २३ |
| | १५.७ देयकाच्या थकबाकीचा हिशोब पुरा करणे | २३ |
| १६ | वीज पुरवठा पुर्ववत सुरू करणे | २४ |
| १७ | वीज पुरवठ्यांत बिघाड | २४ |
| १८ | आकारांची अनुसूची | २४ |
| १९ | वीज पुरवठ्याच्या अटी व शर्ती | २५ |
| २० | वीज पुरवठा संहिता आणि आकारांच्या अनुसूचीची तरतूद | २६ |
| २१ | अर्थनिश्चिती | २६ |
| २२ | आदेश व निदेश देणे | २६ |
| २३ | बद्‍ल करण्याचे अधिकार | २६ |
| २४ | अडचणी दूर करण्याचे अधिकार | २७ |

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी) विनियम, २००५

**विद्युत अधिनियम, २००३**

क्र. मविनिआ/लिगल/१२९/२००५/०११५ - विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम ४५ च्या उप-कलम (२)च्या खंड (ए) सह कलम १८१च्या उप-कलम (२) च्या खंड (यु), कलम ४५चे उप-कलम (५), कलम ४६, कलम ४७चे उप-कलम (१) आणि उप-कलम (४) सह कलम १८१च्या उप-कलम (२)च्या खंड (व्ही) आणि खंड (डब्ल्यु) , कलम ५० सह कलम १८१चे उप-कलम (२) चा खंड (एक्स) आणि कलम १८१च्या उप-कलम (२)च्या खंड (झेडपी) ने प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, याद्वारे खालीलप्रमाणे विनियम करीत आहे:

### १. संक्षिप्त नाव

१.१ या विनियमांस "**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी) विनियम, २००५**" असे म्हणावे.

१.२ हे विनियम सबंध महाराष्ट्र राज्याला लागू राहतील.

१.३ हे विनियम शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

### २. व्याख्या

२.१ या विनियमांत, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर -

(अ) **"अधिनियम"** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६);

(ब) **"अर्जदार"** म्हणजे अधिनियम आणि त्याखाली करण्यांत आलेल्या नियम व विनियमांतील तरतुदींना अनुसरुन विजेच्या पुरवठ्याकरिता, करारांतर्गत माग़णीत/मंजूर भारात वाढ किंवा कपात करण्यासाठी, नावात बदल करण्यासाठी, वीज जोडणी तोडण्यासाठी किंवा पुनः जोडण्यासाठी किंवा करार रद्द करण्यासाठी, जसे असेल तसे, ज्याने अर्ज केला आहे अशी व्यक्ति;

(क) **"अधिकृत प्रतिनिधी "** म्हणजे वितरण परवानाधारकाच्या सर्वसाधारण किंवा विशिष्ट अधिकाराखाली कार्ये पार पाडणारे वितरण परवानाधारकाचे सर्व अधिकारी, कर्मचारी किंवा प्रतिनिधी;

(ड) **"सरासरी पॉवर फॅक्टर"** म्हणजे-

(१) महिन्यामध्ये वापरलेल्या युनीट्सचे महिन्यामध्ये वापरलेले युनिट्स (किलोवॅट तास) आणि महिन्यामध्ये वापरलेले रिएक्टिव्ह युनिट्स (किलोव्होल्ट अँपिअर) यांच्या वर्गाच्या बेरजेच्या वर्गमुळाशी गुणोत्तर; किंवा

(२) महिन्यामध्ये वापरलेल्या किलोवॅट तासांचे किलोव्होल्ट अँपिअर तासांशी असलेले गुणोत्तर;

जे ग्राहकाच्या मीटरमधील नोंदीप्रमाणे असेल व ज्याचे दोन दशांश अंकापर्यंत पूर्णांक करण्यांत येतील.

(इ) **"आयोग"** म्हणजे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग;

(फ) **"करारांतर्गत मागणी "** म्हणजे वितरण परवानाधारक आणि ग्राहक यांच्यात परस्पर मान्यतेने सहमती झालेली किलोवॅट(kw) / किलोव्होल्ट अँपिअर मधील (KVA) करारांत समाविष्ट असलेली किंवा कोणत्याही लेखी पत्राद्वारे सहमती झालेली मागणी;

(ग) **" ग्राहकाधिष्ठित वितरण सुविधा"** म्हणजे वितरण परवानाधारकाच्या वितरण यंत्रणेचा, सेवा-वाहिनी सोडून, भाग असलेल्या अशा सुविधा ज्या स्पष्टपणे व फक्त, एकाच इमारतीतील किंवा संलग्न असलेल्या इमारतींमधील एका ग्राहकाला किंवा ग्राहकांच्या गटाला, विजेचा पुरवठा करण्यासाठी उभारण्यांत आल्या असतील;

(ह) **"गा-हाणे निवारण विनियम"** म्हणजे अधिनियमाच्या कलम १८१ च्या उप-कलम (२) खालील खंड (आर) व (एस) खाली आयोगाकडून विनिर्दिष्ट करण्यांत येतील ते विनियम;

(ई) **"हार्मोनिक्स"** म्हणजे मूलभूत विद्युत्प्रवाहाच्या असलेल्या ५० प्रति सेकंद कंपनांच्या काही पटीत अंतर्भूत असणा-या कंपनांच्या कालबध्द लहरींचा एक भाग जो विद्युत दाब किंवा प्रवाहाच्या पूर्णतः सायन्युसॉइडल लहरींच्या आलेखामध्ये अनियमितता निर्माण करतो आणि ज्याचे नियमन आयइइइ एसटीडी ५१९-१९९२ ने म्हणजे "आयइइइ विद्युत शक्ति यंत्रणेमधील हार्मोनिक्सच्या नियमनासाठी शिफारस केलेल्या रिती व आवश्यक बाबी (IEEE Recommended Practices and Requirements for Harmonic Control in Electrical Power Systems )" आणि अधिनियमाच्या कलम १८५ च्या उप-कलम (२)च्या खंड (सी) नुसार विनिर्दिष्ट करण्यांत येणा-या तत्सम मानकांनी होतेः

(ज) **"उच्च दाब " किंवा "HT"** म्हणजे,भाारतीय विद्युत नियम, १९५६च्या नियम २ मधील उप-नियम (१)च्या खंड (एव्ही) खाली " उच्च " किंवा "अति उच्च" म्हणून व्याख्या करण्यात आलेले आणि अधिनियमाच्या कलम १८५ च्या उप-कलम (२) खंड (सी)ला अनुसरून विनिर्दिष्ट करण्यांत येतील अशा दाबाच्या तत्सम वर्गवारीतील, सर्व दाब;

(ख) **" HT ग्राहक "** म्हणजे उच्च दाबाचा वीज पुरवठा प्राप्त होणारा ग्राहक;

(ल) **"परवानाधारक विद्युत ठेकेदार "** म्हणजे विद्युत ठेकेदार ज्याला विद्युत कामे करण्यासाठी राज्य शासनाने परवाना दिला आहे;

(म) **"लोड फॅक्टर"** म्हणजे एका विवक्षित कालावधीत वापरले गेलेले एकूण युनिट्सचे, जर त्याच संपूर्ण कालावधीत करारांतर्गत मागणी / मंजूर भार कायम राखला गेला असता तर जेवढे एकूण युनिट्स वापरले गेले असते त्यांच्याशी असलेले गुणोत्तर जे , जर त्या काळांत वितरण परवानाधारकाकडून विजेच्या पुरवठा केला गेला असेल तर, नेहमीच टक्केवारीत व्यक्त करण्यांत येईल;

(न) "**लघु दाब**" किंवा "**LT**" म्हणजे, भाारतीय विद्युत नियम, १९५६च्या नियम २ मधील उप-नियम (१)च्या खंड (एव्ही) खाली " उच्च " किंवा "अति उच्च" म्हणून व्याख्या करण्यात आलेल्या आणि अधिनियमाच्या कलम १८५ च्या उप-कलम (२) खंड (सी)ला अनुसरून विनिर्दिष्ट करण्यांत येतील अशा दाबाच्या तत्सम वर्गवारीतील दाबांव्यतिरिक्त, इतर सर्व दाब;

(घ) " **LT ग्राहक** " म्हणजे लघु दाबाचा वीज पुरवठा प्राप्त होणारा ग्राहक;

(प) **"कमाल मागणी "** म्हणजे आयोगाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाने तरतूद केली गेली नसल्यास, किलावॅट किंवा किलोव्होल्ट अँपिअर मधील कोणत्याहि कालावधीच्या संदर्भातील मागणी जी त्या कालावधीत लागोपाठच्या ३० मिनिटांच्या कोणत्याहि गटांत किलोवॅट-तास किंवा किलोव्होल्ट अँपिअर-तास यापैकी कोणत्याहि एककांत पुरविण्यांत आणि घेण्यांत आलेल्या विजेच्या प्रमाणांच्या नोंदविलेल्या संख्यांमधील सर्वांत जी मोठी संख्या असेल तिच्या दुप्पट असलेली मागणी;

(च) **"मीटर"** म्हणजे दिलेल्या वेळेत पुरविण्यांत आलेल्या विद्युत उर्जेचे किंवा वीज पुरवठ्यांत असलेल्या विद्युत उर्जेचे प्रमाण मोजण्यासाठी, आणि/किंवा नोंदविण्यासाठी व साठविण्यासाठी एकत्रित उपकरणांचा संच यामध्ये संपूर्ण करंट मीटर, आणि मिटरींग उपकरणे जसे की करंट ट्रान्सफॉर्मर ,कॅपॅसिटर व्होल्टेज ट्रान्सफॉर्मर, किंवा आवश्यक वायरिंग उपकरणांसहित व्होल्टेज ट्रान्सफॉर्मर यांचा अंतर्भाव होईल तसेच पूर्व-भरणा केलेल्या मीटर्सचाही होईल;

(र) **"महिना "** म्हणजे आकाराची देयके तयार करण्याच्या संदर्भात, इंग्रजी कॅलेंडर महिना किंवा तीस दिवसांचा कोणताहि कालावधी;

(स) **"वहिवाटदार"** म्हणजे जेथे उर्जेचा वापर झाला आहे किंवा होणार आहे अशी जागा ज्याच्या ताब्यांत आहे अशी व्यक्ति;

(त) **"पुरवठ्याचे ठिकाण"** म्हणजे ग्राहकाच्या जागेत वितरण परवानेधारकाच्या बसविलेल्या कट-आऊट च्या बाहेर जाणा-या टर्मिनलचे ठिकाण;

परंतु असे की, उच्च दाब ग्राहकाच्या बाबतीत पुरवठ्याचे ठिकाण म्हणजे अशा उच्च दाब ग्राहकाच्या उपकरणाच्या आधी वितरण परवानेधारकाच्या ठेवलेल्या मीटरच्या कपाटाच्या बाहेर जाणा-या टर्मिनलचे ठिकाणः

परंतु आणखी असेही की, मीटरचे कपाट नसल्यास किंवा, जर मीटर उच्च दाब संचमाडणीच्या लघु-दाबाच्या बाजूला असेल तर, पुरवठ्याचे ठिकाण म्हणजे अशा उच्च दाब ग्राहकाच्या मुख्य स्वीचगिअरच्या प्रवेशी टर्मिनलचे ठिकाणः

(य) **"मंजूर भार "** म्हणजे वितरण परवानाधारक आणि ग्राहक यांच्या परस्पर सामंजस्याने सहमती झालेला किलोवॅट (kw)/ अश्वशक्ती (HP) मधील भार.

(व) **"तात्पुरता पुरवठा"** म्हणजे परवानेधारक वितरक व अर्जदार यांच्यात होणा-या सहमतीप्रमाणे तात्पुरत्या कालावधीसाठी करण्यांत येणारा वीज पुरवठा जो दोन वर्षांपेक्षा जास्त कालावधीचा नसेल.

२.२ यांत वापरलेले आणि व्याख्या न केलेले शब्द किंवा शब्दप्रयोग, यांना अधिनियमांत किवा त्याखाली करण्यांत आलेल्या नियम किंवा विनियमांत नमूद केल्यानुसार अर्थ राहील.

## ३. आकारांची वसूली

३.१ अधिनियमाच्या आणि या विनियमांतील तरतूदींनुसार ज्या व्यक्तीला वीज पुरवठ्याची गरज असेल त्या व्यक्तीकडून वीज पुरवठ्याच्या आकाराची वसूली करण्यास वितरण परवानाधारकास प्राधिकृत करण्यांत आले आहे.

३.२ वितरण परवानाधारकास या विनियमांखाली ज्या आकारांची वसूली करण्यास प्राधिकृत करण्यांत आले आहे त्यांत खालील बाबी समाविष्ट असतील-

(अ) खालील विनियम ३.३ नुसार वीज पुरवठ्याच्या प्रयोजनार्थ विद्युत वाहिनी किंवा विद्युत संयंत्र उभारण्यासाठी वितरण परवानाधारकाला जो वाजवी खर्च झाला असेल अशा खर्चाची वसूली;

(ब) खालील विनियम ३.४ नुसार वितरण परवानाधारकाने केलेल्या वीज पुरवठ्याचा आकार.

## ३.३ वीज पुरवठा करण्यासाठी झालेल्या खर्चाची वसूली

३.३.१ वितरण परवानाधारक वरील विनियम ३.२(अ) येथे संदर्भिलेल्या खर्चाची वसूली या विनियम ३.३ मधील तत्वांना अनुसरुन व आयोगाने विनियम १८ खाली मंजूरी दिलेल्या आकारांच्या अनुसूचीमध्ये असलेल्या दरांच्या आधारे करेल.

परंतु असे की, वितरण परवानाधारक, कोणत्याहि वर्गवारीतील ग्राहकांकडून त्यांना वीज पुरविण्याकरिता उभारलेली विद्युत वाहिनी किंवा विद्युत संयंत्रावरील खर्च, आयोगाच्या संमतीने, सरासरी किंवा प्रमाणकानुसारी (normative) दराने वसूल करु शकेल.

३.३.२ जर एखाद्या अर्जदाराला वीज पुरवठा करताना वितरणाच्या मूख्य वाहिनीपासून अर्जदाराच्या नियोजित जागेपर्यंत सेवा-वाहिनी टाकावी लागणार असेल तर, विनियम १८ खाली आयोगाने मंजूरी दिलेल्या आकारांच्या अनुसूचीच्या आधारे अशा कामासाठी झालेला सर्व वाजवी खर्च अर्जदाराकडून वसूल करण्यास वितरण परवानाधारकास अधिकार राहील.

परंतु असे की, या विनियम ३.३.२ नुसार वाजवीरित्या झालेल्या सर्व खर्चाची वसूली झाली असली तरी, ज्या ग्राहकाला यापूर्वी जोडणी देण्यांत आली आहे त्याला हानिकारक नसेल तर, वितरण परवानाधारकास या सेवा-वाहिनीचा उपयोग अन्य कोणत्याहि व्यक्तीस विजेचा पुरवठा करण्यासाठी करण्याचा हक्क राहील.

३.३.३ जर एखाद्या अर्जदाराला वीज पुरवठा करताना ग्राहकाधिष्ठित वितरण सुविधा उभाराव्या लागणार असतील तर, विनियम १८ खाली आयोगाने मंजूरी दिलेल्या आकारांच्या अनुसूचीच्या आधारे अशा कामासाठी झालेला सर्व वाजवी खर्च अर्जदाराकडून वसूल करण्यास वितरण परवानाधारकास अधिकार राहील.

३.३.४ जर एखाद्या अर्जदाराला वीज पुरवठा करताना, वर ३.३.२ आणि ३.३.३ मध्ये उल्लेखिलेल्या कामांची नाही, तर वितरण यंत्रणा वर्धित करण्यासाठीच्या कामाची गरज लागली तर, वितरण यंत्रणेच्या वर्धनामूळे क्षमतेत झालेल्या वाढीशी अर्जात मागितलेल्या वीज भाराचे जे प्रमाण असेल त्या प्रमाणांत अशा कामावर वाजवीरित्या झालेल्या खर्चाची अर्जदाराकडून वसूली करण्याचा अधिकार वितरण परवानाधारकास राहील.

परंतु असे की, वितरण यंत्रणेच्या वर्धनामूळे क्षमतेत झालेल्या वाढीपैकी अर्जात मागितलेला विद्युत भार जर २५ टक्क्याहून अधिक नसेल तर वितरण परवानाधारकास या विनियम ३.३.४ खाली कोणताही खर्च वसूल करण्याचा अधिकार नसेल.

परंतु पुढे असे की, वितरण यंत्रणेच्या वर्धनाची गरज आणि व्याप्ती याबाबतचा या विनियम ३.३.४ खालील कोणताहि वाद ग्राहक गा-हाणे निवारण विनियमांखाली घालून देण्यांत आलेल्या कार्यपध्दतीनुसार सोडविण्यांत येईल.

३.३.५ वितरण परवानाधारकाने, या विनियमांची अधिसूचना जारी करण्यांत आल्यानंतर केव्हाही, वरील ३.३.३ मध्ये संदर्भ केलेल्या खर्चाची वसूली केली असेल तर, कराराच्या समाप्तीनंतर किंवा या विनियमांना अनुसरुन विजेचा पुरवठा कायमस्वरुपी बंद करण्यांत आल्यानंतर, ग्राहकाचा ग्राहकाधिष्ठित वितरण सुविधांच्या घटीत मूल्यावर हक्क राहील.

परंतु असे की, जेथे अशा सुविधा ग्राहकाने पुरविल्या असतील तेथे, कराराच्या समाप्तीनंतर किंवा या विनियमांना अनुसरुन विजेचा पुरवठा कायमस्वरुपी बंद करण्यांत आल्यानंतर, ग्राहक अशा सुविधा ठेवून घेऊ शकेल.

तथापि असे की, अधिनियमाच्या कलम ५६ खालील कोणतीहि रक्कम ग्राहक न भरु शकल्यामुळे जर वीज पुरवठा तोडण्यांत आला असेल तर, त्या कलमाखाली असणा-या हक्कांखेरीज वितरण परवानेधारकास, या विनियम ३.३.५ खाली ग्राहकास घटीत मुल्याच्या सुविधेपासून मिळण्याचा हक्क असणा-या प्राप्य रकमा समायोजित करण्याचा किंवा वितरण परवानेधारकास अशा ग्राहकाकडून येणे असलेल्या रकमांच्या पोटी अशी घटीत मूल्याची सुविधा ठेवून घेण्याचाही, हक्क राहील.

३.३.६ जर एखाद्या ग्राहकास विजेचा तात्पुरता पुरवठा हवा असेल तर, या विनियम ३.३ मध्ये कोणतीहि तरतूद असली तरी, विजेचा असा तात्पुरता पुरवठा करण्यासाठी किंवा असा तात्पुरता पुरवठा बंद करण्यासाठी झालेला सर्व वाजवी खर्च वसूल करण्याचा अधिकार वितरण परवानाधारकास राहील;

परंतु असे की, अशा तात्पुरत्या वीज पुरवठ्यासाठी जर वितरण परवानाधारकाने कामे केली असतील आणि त्यावरील खर्च ज्या व्यक्तीला असा तात्पुरता पुरवठा हवा आहे तिने केला असेल तर असा तात्पुरता पुरवठा बंद करताना या कामाच्या घटीत मूल्याची रक्कम अशा व्यक्तिच्या नांवे जमा करण्यांत येईल आणि सुविधा वितरण परवानेधारकास परत करण्यांत येईल.

परंतु असे की, ज्या व्यक्तीला असा तात्पुरता वीज पुरवठा हवा असेल त्याने जर या पुरवठ्यासाठीची संबंधीत कामे केली असतील तर असा पुरवठा बंद करताना अशा व्यक्तीला अशी कामे ठेवून घेण्याचा हक्क राहील.

३.३.७ ग्राहकाला वीज पुरवठा करण्यासाठी अशा पुरवठ्याच्या कालावधीत पुरवठा करण्यासाठी लागणा-या कामाची देखभाल वितरण परवानाधारक करेल.

३.३.८ जर वितरण परवानाधारकाने अर्जदाराला या विनियम ३.३ खालील कामे परवानाधारक विद्युत ठेकेदाराकडून करुन घेण्यास संमती दिली असेल तर, या कामापैकी ज्या भागाचे काम अर्जदाराने केले असेल त्या कामावरील खर्च वसूल करण्याचा वितरण परवानाधारकाला हक्क राहणार नाही.

परंतु तथापि असे की, वितरण परवानाधारकाने अशा कामाच्या केलेल्या पर्यवेक्षणासाठी पर्यवेक्षण आकार, ज्यास कलम १८खाली आकारांच्या अनुसूचीत मंजूरी देण्यांत आली अहे अशा दराने, जो वितरण परवानाधारकास अशी कामे करण्यासाठी जी मजूरी द्यावी लागली असती तिच्या १५ टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही, वितरण परवानाधारकाला अर्जदाराकडून वसूल करण्याचा हक्क राहील.

## ३.४ वीज पुरवठ्याचा आकार

३.४.१ आयोगाने वेळोवेळी निश्चित केलेल्या विजेच्या दरांप्रमाणे पुरवठा केलेल्या विजेचा आकार वसूल करण्याचा अधिकार वितरण परवानाधारकाला राहील.

परंतु असे की, एकाच क्षेत्रांत दोन किंवा अधिक वितरण परवानाधारकांनी विजेचा पुरवठा केल्यास, आयोग विजेच्या किरकोळ विक्रीसाठी वीज दराची फक्त कमाल मर्यादा निश्चित करेल.

३.४.२ अधिनियमाच्या कलम ४२ च्या उप-कलम (२) आणि उप -कलम (३)च्या तरतूदीखाली . विजेच्या वहनासाठी विनिर्दिष्ट करण्यात आलेला अधिभार आणि आकार आणि अधिनियमाच्या

कलम ४२च्या उप-कलम (४) च्या तरतूदीखाली विनिर्दिष्ट करण्यात आलेला अतिरिक्त अधिभार देखील वसूल करण्याचा अधिकार वितरण परवानाधारकाला राहील.

३.४.३ वेगळे विनिर्दिष्ट केले नसल्यास, सर्व उच्च-दाबाचे आणि लघु-दाबाचे आकार हे पुरवठ्याच्या एका ठिकाणाच्या संदर्भांत असतील आणि प्रत्येक स्वतंत्र आस्थापनेला वेगळे पुरवठ्याचे ठिकाण देण्यांत येईल.

३.४.४ वीज दराच्या विनिर्दिष्ट करण्यांत येतील त्या अटी व शर्तींना अनुसरुन या विनियम ३.४खाली पुरविण्यांत आलेल्या विजेच्या आकारांत प्रत्यक्ष पुरवठा करण्यांत आलेल्या विजेच्या आकराशिवाय स्थिर आकाराचाही समावेश असू शकेल.

३.४.५ आयोगाने निश्चित केलेल्या आकारांशिवाय, प्रचलित असलेल्या कायद्यांनुसार देय असलेले सर्व कर, शुल्क आणि इतर सांविधिक आकार ग्राहकास प्रदान करावे लागतील.

## ४. वीज पुरवठ्यासाठी अर्ज

४.१ विजेच्या पुरवठ्यासाठी, किंवा अतिरिक्त विद्युत भारासाठी, सेवा पुरवावयाच्या ठिकाणांत बदलकरण्यासाठी, सेवेचा विस्तार किंवा पुरवठा पूर्ववत सुरु करण्यासाठी, अर्ज करताना वितरण परवानाधारकाकडे अर्जदाराने खालील माहिती/ तपशील / कगदपत्रांसह अर्ज क्रणे आवश्यक आहे :

(१) अर्जदाराचे नाव आणि ज्या जागेत वीज पुरवठ्याची मागणी करण्यांत आली आहे त्या जागेचा अर्जदार मालक आहे किंवा नाही ;

(२) अर्जात ज्या जागेत वीज पुरवठयासाठी मागणी करण्यात येत आहे त्या जागेचा पत्ता व तसेच देयक पाठविण्याचा पत्ता, जर तो या जागेहून वेगळा असेल तर;

(३) अर्जदार जर जागेचा मालक नसेल तर, मालकाचे नाव;

(४) विजेच्या वापराचा उद्देश आणि अशा प्रत्येक उद्देशासाठी मागितलेला भार;

(५) अर्ज नवीन जोडणीसाठी आहे का, पुरवठ्याच्या ठिकाणांत बदल झाल्यामुळे आहे का, अतिरिक्त भार, सेवेच्या विस्तारासाठी, नावातील बदलासाठी किवा पुर्ववत पुरवठा चालू करण्यासाठी आहे का (जर जोडणी खंडीत केलेला कालावधी सहा महिन्यांपेक्षा कमी असेल तर ) ;

(६) त्या जागेत वायरिंगचे काम प्रमाणित करणार असणा-या परवानाधारक विद्युत ठेकेदाराचे नांव, पत्ता, परवाना क्रमांक, संपर्काचा दूरध्वनी क्रमांक आणि ई-मेलचा पत्ता (असल्यास);

(७) अर्जदाराकडून प्रचलित असणा-या कोणत्याहि कायद्याखाली लागणारी अतिरिक्त कागदपत्रे लागू शकतील ;

परंतु असे की, अर्जाच्या नमुन्यांत (अ) ज्या कामांसाठी मुख्यतः वीज वापरण्यांत येणार आहे त्यांची आणि (ब) वितरण परवानेधराकास जागेवर वीज पुरवता सुरु करताना ज्या कागदपत्रांची आवश्यकता असते त्यांची, ती ज्या कायद्याखाली लागतात त्या कायद्यांतील विशिष्ट तरतूदीच्या उल्लेखासह, यादी देण्यांत येईल.

परंतु आणखी असेही की, जर अर्जदार घरगुती वीज दराच्या वर्गवारीतील ग्राहक असेल तर पुढीलपैकी कोणत्याही एका कागदपत्राची गरज अर्जाच्या छाननीच्या वेळी लागेल - १) रेशन कार्ड, २) फोटो-पास, ३) मतदार कार्ड, ४) पासपोर्ट, ५) राहत्या घरासंबंधीची कागदपत्रे;

(८) वितरण परवानाधारकाकडून विजेचा पुरवठा किंवा ग्राहक सेवा सुकरपणे मिळावी , म्हणून अर्जदार स्वतःहून जादा माहिती देऊ शकेल.

(९) विनियम १८ खाली आयोगाने मान्यता दिलेल्या आकारांच्या अनुसूचीवर आधरित अर्जाच्या छाननीसाठी शुल्क किंवा ते भरल्याची पावती .

परंतु असे की, वितरण परवानाधारक, अर्जदाराने दिलेल्या पर्यायी कागदपत्रांची छाननी करुन स्वतःहून वीज पुरवठा सुरु करु शकेल.

४.२ या विनियम ४ खालील अर्जाचा नमुना हा मराठी व इंग्रजीत असेल आणि तो वितरण परवानाधारकाच्या अर्ज स्वीकारल्या जाणा-या प्रत्येक कार्यालयांत उपलब्ध करुन देण्यांत येईल;

परंतु असे की, वितरण परवानाधारक त्याच्या वेब-साइटवर, ईलेक्ट्रॉनिक माध्यमांतून उतरवून घेता येईल अशा स्वरुपात (downloadable format ) अर्जाचा नमुना, उपलब्ध करुन देईल.

परंतु आणखी असे की, वितरण परवानाधारकाच्या प्रत्येक कक्ष कार्यालयात/ प्रभाग कार्यालयात/ ग्राहक केंद्रांत अर्ज स्वीकारण्यांत येईल.

परंतु तथापि असे की, HT वर्गवारीतील ग्राहकांच्या अर्जाच्या बाबतीत, त्यांचे अर्ज विभागीय कार्यालय/ मंडल कार्यालय/प्रभाग कार्यालय/ वितरण परवानेधारकाच्याच्या ग्राहक केंद्रात स्वीकारण्यांत येतील.

४.३ वितरण परवानाधारकाचे खालील गोष्टी करण्याचे कर्तव्य राहील-

(१) प्रत्येक स्वीकारण्यांत आलेल्या अर्जाची यथायोग्य प्राधिकृत करण्यांत आलेली पोच-पावति देण्याचे;

(२) विजेच्या पुरवठ्यासाठीचे अर्ज स्वीकारण्यात येणा-या प्रत्येक कार्यालयांत खालील बाबींची माहिती ठेवण्याचे;

(अ) अर्जाचा तपशील आणि;

(ब) अर्जाची सद्यस्थिती.

(३) जेथे अर्ज स्वीकारण्यात येतात अशा प्रत्येक कार्यालयांत प्रत्येक वर्गवारीतील ज्या दिनांकापर्यंतचे अर्ज, निकालात काढण्यांत आले आहेत तो दिनांक प्रदर्शित करण्याचे;

(४) अर्जदाराने विनंती केल्यास त्यास त्याच्या अर्जाची सद्यस्थिती आणि तो अद्याप निकाली निघाला नसल्यास व त्याची कारणे, असल्यास, ती कळविण्याचे.

४.४ अधिनियम, किंवा त्याखाली करण्यांत आलेले नियम आणि विनियम किंवा त्यावेळी अस्तित्वांत असणा-या कायद्यांत अन्य तरतूद नसल्यास, वितरण परवानाधारक, जेथवर शक्य असेल तेथवर, वीज दराच्या प्रत्येक वर्गवारीत, “प्रथम आलेल्यास प्रथम” या तत्त्वावर विजेचा पुरवठा करेल.

परंतु असे की, अधिनियमाच्या कलम ४३ व अधिनियमाखाली करण्यांत आलेल्या विनियमांमध्ये नमूद केलेल्या काल-मर्यादेत विजेचा पुरवठा करण्याच्या बंधनास अधीन राहून, वितरण परवानाधारक, वीज पुरवठ्याबाबत वितरण परवानाधारकाच्या अन्य कोणत्याहि खास योजने अंतर्गत विजेची जोडणी देऊ शकेल.

## ५. अर्जाची छाननी

५.१ विनियम ४.१ नुसार सर्व आवश्यक माहिती आणि कागदपत्रांसह यथायोग्यरित्या पूर्ण असलेला अर्ज वितरण परवानाधारकाला प्राप्त झाल्यावर, वितरण परवानाधारक खालील बाबींची पूर्तता करुन घेण्यासाठी अधिकृत प्रतिनिधी पाठवेल-

(अ) वीज पुरवठा सुरु करण्याच्या तांत्रिक बाबींचा अभ्यास करण्यासाठी; आणि

(ब) अर्जदाराला पूर्व सूचना देऊन, ज्या जागेत वीज पुरवठा करावयाचा आहे त्या जागेची तपासणी करण्यासाठी.

५.२ संबंधित जागेत वीज पुरवठा सुरु करण्यासाठी, अर्जदाराच्या सहमतीने अधिकृत प्रतिनिधी मेन्स, कट-आउट्स किंवा सर्किट ब्रेकर्स, आणि मीटर्स यांची जागा निश्चित करेल व जागेसाठी विद्युत भार मंजूर करेल.

परंतु असे की, विद्युत पुरवठ्याची जागा ही सर्वसाधारणपणे प्रवेशाच्या दृष्टीने सोप्या ठिकाणी असेल व मीटर अशा उंचीवर बसविण्यांत येईल की जेथून नोंदी घेणे व मीटर बाह्य वातावरणापासून सुरक्षित ठेवणे शक्य होईल.

५.३ वरील विनियम ५.१ मध्ये उल्लेखलेली राहत्या जागेची तपासणी, त्या जागेत रहात असलेल्या प्रौढ पुरुष सदस्याच्या किवा त्याच्या प्रतिनिधीच्या , उपस्थितीतच सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत करण्यांत येईल.

५.४ विनियम ५.१ मध्ये उल्लेखलेली तपासणी करण्यांत आल्यानंतर वितरण परवानाधारक अर्जदारास, अद्याप कोणती कामे करुन घेणे आवश्यक आहे व त्यासाठी त्यास , विनियम ३.३ नुसार किती खर्च करावा लागेल ते कळवेल व त्याने अद्याप सादर करावयाची कागदपत्रे, मंजू-या व कायदेशीर परवानग्या यांची यादी देईल.

५.५ जर वितरण परवानाधारकाच्या मते, विजेच्या पुरवठ्यासाठी अर्जदाराच्या जागेत वितरण रोहित्र (distribution transformer) बसविणे आवश्यक असेल तर अर्जदार, ज्या कालावधीकरिता विजेचा पुरवठा करावयाचा आहे तितक्या कालावधीकरिता वितरण रोहित्र बसविण्यासाठी वितरण परवानाधारकास, जमिन किंवा त्या जागेत योग्य अशी खोली भाडेपट्ट्याने (lease) उपलब्ध करुन देईल.

परंतु असे की, भाडेपट्ट्यावर द्यावयाच्या जमिनीच्या अथवा खोलीच्या अटी व शर्ती, सध्याचे बाजार-भाव लक्षांत घेऊन वितरण परवानाधारक आणि अर्जदार, यांच्या परस्पर सहमतीने ठरविण्यांत येतील.

परंतु आणखी असे की, या विनियमांच्या राजपत्रांतील प्रसिध्दीच्या तारखेस, अशा जमिनी चा किंवा जागेचा वापर करण्यासाठी जो करार अस्तित्वांत असेल त्याची मुदत संपलानंतर, पक्षकारांच्या परस्पर

सहमतीने मान्य झालेल्या अशा अटी व शर्तीच्या आधारे ज्या या विनियम ५.५ शी सुसंगत असतील अशा पध्दतीने, कराराचे नूतनीकरण करण्यांत येईल.

परंतु असेही की, या विनियमांच्या राजपत्रांतील प्रसिध्दीच्या तारखेस, वितरण परवानाधारक अशा जमिनीचा किंवा जागेचा वापर कराराशिवाय किंवा जो संपण्याची निश्चित तारीख नसेल अशा कराराखाली करीत असेल , तर अशा जमिनी किंवा जागेचा वापर करण्याची अशी व्यवस्था किंवा करार, जसे असेल तसे, हे विनियम राजपत्रांत प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून दोन (२) वर्षांच्या शेवटी, संपष्टात आले असल्याचे मानण्यांत येईल. त्यानंतर, पक्षकारांनी परस्पर सहमतीने ठरविलेल्या अटी व शर्तीच्या आधारे, ज्या या विनियम ५.५ शी सुसंगत असतील, एक नवीन करार करण्यांत येईल.

५.६ विनियम ५.५मध्ये काहीही नमूद करण्यांत आले असले तरी, जमिन किंवा खोलीची तरतूद जर स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही उचित प्राधिकरणाच्या विकास नियंत्रण नियमांनुसार होणार असेल तर अशी जमिन किंवा खोली वितरण परवानाधारकास वापरासाठी देण्याच्या अटी व शर्ती या संबंधित स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा राज्य शासनाच्या उचित प्राधिकरणाच्या नियमांनुसार असतील.

५.७ सर्व दृष्टींनी पूर्ण असा अर्ज आवश्यक त्या शुल्कांसह प्राप्त झाल्यावर आणि वितरण परवानाधारकास हवी असणारी जमिन किंवा खोली मिळाल्यानंतर , वितरण परवानाधारक पुरवठ्यास मंजूरी देईल व त्यासाठी आवश्यक ती कामे करेल किंवा करुन घेण्यास परवानगी देईल, ज्यायोगे वीज पुरवठा करणे शक्य होईल.

५.८ या विनियमांत कोणतीही तरतूद असली तरी, वरील विनियम ४नुसार आवश्यक ती सर्व माहिती/ कागदपत्रांसह मिळाल्यानंतर, विनियम ३ नुसार वितरण परवानाधारकाच्या मान्यता देण्यांत आलेल्या सर्व शुल्कांच्या प्रदानानंतर , वरील विनियम ५.५ आणि विनियम ५.६ नुसार योग्य अशी जमिन किंवा खोली उपलब्ध झाल्यानंतर आणि अर्जदार व वितरण परवानाधारक यांना अस्तित्वांत असणा-या प्रचलित कायद्यांखाली हव्या असणा-या सर्व मंजू-या व परवानग्या प्राप्त झाल्यानंतर, अर्ज प्राप्त झाला आहे असे मानण्यांत येईल.

५.९ या विनियमांच्या अधिसूचनेच्या तारखेच्या तीन महिन्यानंतर कृषी पंपांकरिता मंजूर करण्यांत आलेल्या सर्व वीज जोडण्यांकरिता मीटर्स बसविण्यांत येतील व पंप सेट्सच्या क्षमतेनुसार जोपर्यंत त्यास योग्य प्रतीचे कॅपॅसिटर्स लावण्यांत येत नाहीत तोपर्यंत वीज पुरवठा सुरू करण्यांत येणार नाही.

परंतु असे की, या कालवधीपुर्वी मंजूर करण्यांत आलेल्या सर्व वीज जोडण्यांकरिता पंप सेट्सच्या क्षमतेनुसार योग्य प्रतीचे कॅपॅसिटर्स पंप सेटसना, अधिसूचनेच्या तारखेपासून तीन वर्षाच्या आंत लावण्यांत आले पाहिजेत.

परंतु आणखी असे की, अधिसूचनेच्या तारखे पूर्वी जोडण्यांत आलेल्या परंतु मीटर न बसविलेल्या सर्व जोडण्यांना आयोगातर्फे मीटरींगच्या संदर्भात वेळोवेळी देण्यांत आलेले निदेश लागू राहतील.

## ६. करार

६.१ वितरण परवानाधारक अर्जदारास नवीन वीज जोडणी प्राप्त करुन घेण्यासाठी, नावातील बदलासाठी आणि मंजूर भारांत वाढ करण्यासाठी करार करण्यास सांगू शकेल.

परंतु असे की, पन्नास किलो-वॅटस (६७ एचपी/ ६३ किलो-व्हॉल्ट-अँपिअर) पेक्षा कमी भारासाठी या विनियम ६.१ मध्ये तरतूद केल्यानुसार कराराची गरज राहणार नाही व सादर करण्यांत आणि स्वीकारण्यांत आलेला अर्ज हाच करार राहील.

६.२ वितरण परवानाधारकाच्या वेब-साईटवर ईलेक्ट्रॉनिक माध्यमातून उतरवून घेता येईल अशा स्वरुपांत कराराचा नमुना उपलब्ध करुन देण्यांत येईल.

६.३ करार करण्यांत आल्यानंतर त्याची एक प्रत ग्राहकास देण्यांत येईल.

६.४ करारात खालील तपशील असेल:

(१) ग्राहकाचे नाव;

(२) करारांत ज्या जागेस वीज पुरवठा करण्यात येणार आहे, त्या जागेचा पत्ता;

(३) मंजूर भार, करारांतर्गत मागणी आणि विजेच्या वापराचे कउद्देश; आणि

(४) अर्जदार जाहीर करेल की :

(अ) तो अधिनियम आणि या विनियमांतील तरतुदींचे पालन करेल;

(ब) तो प्रचलित वीज दराने वीज पुरवठ्यासाठी किंमत चुकती करेल;

(क) तो वितरण परवानाधारकाच्या मान्यता देण्यांत आलेल्या शुल्कांच्या अनुसूचीनुसार द्यावे लागाणारे आणि या विनियमांनुसार देय होणारे इतर सर्व योग्य आकार भरणा करेल;

(ड) तो अधिनियम आणि या विनियमांतील तरतुदीनुसार वितरण परवानाधारकास जितकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून त्याच्याकडे मागण्याचा हक्क असेल तितक्या रकमेचा भरणा करेल.

६.५ ग्राहकाची वीज जोडणी कायमसाठी तोडण्यांत आल्यानंतर किंवा जर ग्राहकाची वीज जोडणी सहा (६) महिन्यांहून अधिक कालावधीकरिता तोडण्यांत आलेली असेल तर करार संपुष्टांत आला आहे असे मानण्यांत येईलः

परंतु असे की, कराराच्या समाप्तीमुळे करारांतर्गत येणे असलेल्या रकमांची वसूली करण्याच्या वितरण परवानाधारकास किंवा ग्राहकास अधिनियमाखाली असणा-या हक्कास बाधा येणार नाही.

६.६ वितरण परवानाधारकास तीस दिवसांची सूचना देऊन ग्राहक करार संपुष्टांत आणू शकेल.

६.७ जेव्हा ग्राहकाच्या सूचनेने करार संपुष्टांत येईल तेव्हा वितरण परवानाधारक जोडणी तोडण्यांत आल्यानंतर ग्राहकास चौदा दिवसात करार संपुष्टांत आल्याची लेखी सूचना देईल व जर त्याने अशी सूचना दिली नाही तरी ती त्याने ग्राहकास दिली आहे, असे मानण्यांत येईल.

६.८ ग्राहकाकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर वितरण परवानाधारक करारांतर्गत मागणीत/ मंजूर भारांत वाढ किंवा कपात करेल.

परंतु असे की , करारांतर्गत मागणीत/ मंजूर भारांत वाढ किंवा कपात करताना जर काही काम करावे लागले तर त्यासाठी झालेला खर्च, विनियम ३.३ मध्ये विनिर्दिष्ट करण्यांत आलेल्या तत्वांनुसार जी विनियम १८ मध्ये आयोगाने मान्यता दिलेल्या आकारांच्या अनुसूचीतील दरांवर आधारीत असतील, वितरण परवानाधारक वसूल करेलः

परंतु आणखी असे की, करारांतर्गत मागणीत/ मंजूर भारांत वाढ किंवा कपात करण्याच्या अर्जास अनुसरुन अशा कामांची गरज व व्याप्ती या संदर्भात वाद निर्माण झाल्यास तो गा-हाणे निवारण विनियमांखाली घालून देण्यांत आलेल्या कार्यपध्दतीनुसार मिटविण्यांत येईल.

## ७. वितरण परवानाधारकाच्या मालमत्तेची देखभाल करणे

वितरण परवानाधारकाच्या अधिकृत प्रतिनिधीशिवाय किंवा अधिनियम आणि त्याखाली करण्यांत आलेल्या नियम व विनियमांखाली प्राधिकृत करण्यांत आलेल्या व्यक्तीशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तीस, ग्राहकाच्या जागेत असलेल्या वितरण परवानाधारकाच्या कोणत्याही विद्युत संयंत्र, विद्युत वाहिन्या किंवा मीटर चालविण्यास, हात लावण्यास किंवा काढून टाकण्यास अथवा वितरण परवानाधारकाच्या अशा मालमत्तेवर लावलेली मोहोर, नामपट्टी व ओळख (distinguishing) क्रमांक किंवा खुणा तोडण्याचा , काढून टाकण्याचा , खोडण्याचा किंवा कोणत्याहि प्रकारे त्यांत हस्तक्षेप करण्याचा अधिकार असणार नाही.

परंतु असे की, अधिकृत प्रतिनिधी या विनियम ७ खालील कोणतीही कामे ग्राहकाच्या किंवा त्याच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीच करेल.

परंतु आणखी असे की, वितरण परवानाधारक त्याच्या अधिकृत प्रतिनिधीच्या ग्राहकाच्या जागेस देण्यांत येणा-या भेटीची पूर्व सूचना ग्राहकास देईल. परंतु जेव्हा या जागेत कोणतीही व्यक्ती विजेचा अनधिकृतपणे वापर करीत असल्याबाबत विश्वास ठेवण्यासारखे कारण असेल आणि/ किंवा अधिनियमांतील भाग १४ मध्ये उल्लेखलेल्या स्वरुपाचे अपराध करीत असेल, तेव्हा तो अशा भेटीची पूर्व सूचना ग्राहकास देणार नाही.

## ८. ग्राहकाच्या जागेत प्रवेश

८.१ अधिनियमाच्या भाग १२, भाग १४ आणि अधिनियमाच्या कलम १६३ मधील तरतूदींना अधीन राहून, वितरण परवानाधारक ग्राहकाच्या जागेत पुरवठ्याच्या ठिकाणुपलिकडे प्रवेश करणार नाही.

८.२ राहत्या जागेतील प्रौढ पुरुष सदस्याच्या किंवा त्याच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीतच जागेची तपासणी सुर्यास्त व सूर्योदय या दरम्यान करण्यांत येईल.

८.३ ग्राहकाच्या जागेत प्रवेश करताना, अधिकृत प्रतिनिधी त्याच्या नावाची नाम-पट्टी नीट दिसेल अशा रितीने लावेल व त्याचे ओळख-पत्र किंवा वितरण परवानाधारकाने दिलेले प्राधिकार-पत्र तपसणीसाठी देईल व ग्राहकास जागेत प्रवेश करण्याचे कारण सांगेल. अधिकृत प्रतिनिधी जागेत करावयाच्या कामाचा तपशील असणारे कार्य-विवरणपत्र (job sheet) किंवा काय दिेश देखील (work order) त्याच्याबरोबर ठेवेल व जागेत प्रवेश करण्यापूर्वी ते ग्राहकास तो दाखवेल.

८.४ अधिनियमाच्या भाग १२ किंवा भाग १४ उल्लेखलेल्या स्वरुपाचा अपराध ग्राहकाच्या जागेवर होत असल्याचा संशय येण्यास कारण असेल तर अशा जागेस राज्य शासनाने अधिनियमाच्या कलम १२६ खाली पदनिर्देशीत केलेल्या अधिका-याने किंवा राज्य शासनाने अधिनियमाच्या कलम १३६ खाली प्राधिकृत केलेल्या अधिका-याने दिलेल्या भेटीची नोंद,

वितरण परवानेधारकाने ठेवलेल्या नोंद-वहीत अशा अधिका-याचे नांव व ग्राहकाच्या जागेस दिलेल्या भेटीच्या तपशीलासह, ठेवण्यांत येईल.

परंतु पुढे असे की, जेथे शक्य असेल तेथे, भेटीसाठी दोन स्वतंत्र साक्षीदार नेण्यांत येतील आणि अशा अधिका-याने ग्राहकाच्या जागेस दिलेल्या भेटीच्या निष्कर्षाबाबतचा एक तपासणी अहवाल तयार करण्यात येईल , ज्यावर ग्राहकाने आणि/ किंवा त्याच्या प्रतिनिधीने, त्याचे अभिप्राय असल्यास त्यासह, आणि अशा साक्षीदारांनी सह्या केलेल्या असतील.

परंतु असेही की, ग्राहकाने अथवा त्याच्या प्रतिनिधीने तपासणी अहवालावर सही करण्यास नकार दिल्यास त्याची देखील नोंद तपासणी अहवालांत करण्यांत येईल.

परंतु असेही की, ग्राहकाने विनंति केल्यास तपासणी अहवालाची एक प्रत त्याला देण्यांत येईल.

८.५ अधिनियमाच्या कलम १३५च्या उप-कलम (१) च्या खंड (ए), (बी) किंवा (सी) मध्ये उल्लेखलेल्या स्वरुपाच्या कृत्यांनुसार जो अप्रामाणिकपणे विजेची उचलेगिरी, उपभोग, किंवा वापर करेल त्याला सदर कलमामध्ये नमूद केलेले परिणाम भोगावे लागतील.

परंतु असे की, या विनियमामध्ये उल्लेखलेले काहीही, अधिनियमाच्या कलम १२६ मध्ये नमूद केलेल्या विजेच्या अनधिकृत वापरास लागू होणार नाही.

८.६ राज्य शासनाने नेमलेल्या अधिका-यास अप्रामाणिकपणे विजेची उचलेगिरी, उप्भोग आणि वापर जेवढ्या कालावधीकरिता झाल्याचे स्पष्टपणे सिध्द करुन दाखाविता येईल, त्या संपूर्ण कालावधीकरिता अधिनियमाच्या कलम १३५ खाली आकार निर्धारण करण्यांत येईल.

परंतु असे की, विनियम ८.६ खाली आकार निर्धारण करण्यासाठी जास्तीत जास्त कालावधी, अप्रामाणिकपणे विजेची उचलेगिरी, उपभोग आणि वापर झाल्याचे उघडकीस येण्याच्या दिनांकापूर्वीची, दोन वर्षे राहील.

परंतु असे की, ज्या वर्गवारीतील सेवेचे अशा रितीने आकार निर्धारण करण्यांत येत आहे त्या वर्गवारीतील सेवेस लागू असणा-या वीज दराच्या दीड-पट इतक्या दराने आकार निर्धारण करण्यांत येईल.

परंतु असेही की, अधिनियमाच्या कलम १३५ खाली विजेची अप्रामाणिक उचलेगिरी, उप्भोग आणि वापराचा कालावधी सिध्द करता आला नाही तर तो हे उघडकीस येण्याच्या दिनांकापूर्वीचे सहा महिने इतका मानण्यांत येईल.

## ९. ग्राहकाच्या जागेचे वायरिंग करणे

ग्राहकाच्या जागेत पुरवठ्याच्या ठिकाणापुढील वायरिंग हे ग्राहकास करावे लागेल आणि ते भारतीय विद्युत नियम, १९५६ मध्ये, जोपर्यंत अधिनियमाच्या तरतूदीनुसार त्यासाठी कोणतेही नियम किंवा विनियम करण्यांत येत नाहीत तोपर्यंत, विनिर्दिष्ट करण्यांत आलेल्या मानकांना अनुसरुन असेल.

## १०. नावांतील बदल

१०.१ ग्राहकाच्या निधनानंतर किंवा जागेच्या मालकीत किंवा वहिवाटदारीत बदल झाल्यास नवीन मालकाने किंवा वहिवाटदाराने नावांतील बदलासाठी अर्ज केल्यावर, विद्युत जोडणी दुस-या व्यक्तीच्या नावे बदलण्यांत येईल.

परंतु असे की, अशा रितीने केलेल्या नावांतील बदलामुळे अर्जदारास जोडणी नवीन ठिकाणी बदलून मागण्याचा हक्क राहणार नाही.

१०.२ नावातील बदलासाठीच्या अर्जासोबत वितरण परवानाधारकास मान्यता देण्यांत आलेल्या आकारांच्या अनुसूचीत नमूद करण्यात आलेले आकार भरणा करण्यांत येतील.

१०.३ विनियम १०.२ खाली अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडण्यांत येतील -

(१) जोडणी हस्तांतरितीच्या (Transferee) नांवे हस्तांतरण करण्यास हस्तांतरकाचे (Transferor) मान्यता पत्र;

(२) मान्यता पत्र नसल्यास , जागेच्या संदर्भांत पुढीलपैकी कोणतेही एक कागदपत्र - (अ) जागेच्या मालकीचा पुरावा; (ब) वाटणी झाली असल्यास, वाटणी करार; (क) नोंदणीकृत दस्तऐवज; (ड) वारसाचे प्रमाणपत्र;

(३) कायद्याच्या दृष्टिने गरज असल्यास, जागेस ज्या कारणासाठी वीज पुरवठा करण्यांत येणार आहे त्यासंबधीच्या परवान्याची फोटो-कॉपी;

(४) छाननी शुल्क किंवा ते भरणा केल्याची पावती.

१०.४ नावातील बदलासाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर वितरण परवानाधारक नावातील बदलाबाबत त्याचा निर्णय, नावांतील बदलासाठीच्या अर्जाच्या दिनांकापासूनच्या दुस-या देयक चक्राच्या आंत ग्राहकास कळवेल.

परंतु असे की, जर वितरण परवानाधारक नावातील बदलास परवानगी देणार नसेल किंवा नाकारणार असेल तर तो तसे करण्यापूर्वी ग्राहकास त्यासंबंधीचे म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी देईल.

परंतु पुढे असेही की, वितरण परवानाधारक नकाराची कारणे ग्राहकास लेखी कळवेल.

१०.५ जर मृत ग्राहक किंवा जागेचा पूर्वीचा मालक/ वहिवाटदार , जसे असेल तसे, यांनी विजेचा आकार किंवा विजेच्या आकाराशिवाय अन्य कोणतीहि वितरण परवानेधारकास देय असलेली रक्कम अदा करणे बाकी राहिले असेल तर तो बोजा, जागा ज्या कायदेशीर प्रतिनिधी/ कायदेशीर वारस किंवा जागेचा नवीन मालक/ वहिवाटदार यांच्या नांवे हस्तांतरित झाली असेल, जसे असेल तसे, यांच्यावर राहील आणि अशा कायदेशीर प्रतिनिधी/ कायदेशीर वारस किंवा जागेचा नवीन मालक/ वहिवाटदार यांच्याकडून वितरण परवानाधारक वसूल करेल.

परंतु असे की, कायदेशीर वारसाला जोडणीच्या हस्तांतरणाच्या बाबतीत, विनियम १०.५नुसार येणारा बोजा, जास्तीत जास्त सहा महिने अगोदर पर्यंतच्या कालावधीत फक्त अशा जागेला पुरविण्यांत आलेल्या वीजेच्या चुकत्या न केलेल्या आकारा इतकाच , मर्यादीत राहतील.

## ११. सुरक्षा अनामत

११.१ अधिनियमाच्या कलम ४७च्या उप-कलम (५)ला अधीन राहून, कोणत्याही व्यक्तीला, जिला वीज पुरवठा मंजूर झाला आहे, वितरण परवानाधारक अधिनियमाच्या कलम ४७च्या उप-कलम (१)च्या खंड (ए) नुसार, सुरक्षा अनामत भरणा करण्यास सांगू शकेल.

११.२ वर विनियम ११.१ मध्ये उल्लेखलेली सुरक्षेची रक्कम, तीन महिन्यांच्या देयकांच्या सरासरी इतकी किंवा देयक चक्राच्या कालावधीइतकी यापैकी, जी कमी असेल तितकी, असेल. या विनियम११.२ च्या प्रयोजनार्थ देयकाची सरासरी रक्कम निश्चित करण्यासाठी, मागील १२ महिन्यातील ग्राहकांच्या देयकांची सरासरी किंवा त्यापेक्षा कमी कालावधीकरिता पुरवठा केला असल्यास अशा कमी कालावधीतील देयकाची सरासरी , विचारांत घेण्यांत येईल.

परंतु असे की, मोसमी ग्राहकांच्या बाबतीत त्यांना मोसमाच्या कालावधीत करण्यांत आलेल्या वीज पुरवठ्याची देयके, या विनियम ११.२ च्या प्रयोजनार्थ, देयकांच्या सरासरीची परिगणना करण्यासाठी विचारांत घेण्यांत येतील.

**स्पष्टीकरणः** या विनियम ११.२च्या प्रयोजनार्थ, “मोसमी ग्राहक” म्हणजे असे ग्राहक जे सर्वसाधारणपणे वर्षाच्या काही कालावधीत, जो नऊ (९) महिन्यांहून जास्त नसेल, काम करतात व त्यांत, कॉटन जिनिंग फॅक्टरीज, कॉटन सीड ऑइल मिल्स, कॉटन प्रेसिंग फॅक्टरीज, मीठ उत्पादक, खांडसरी/ गूळ उत्पादक युनिट्स आणि ज्यांनी विजेच्या मोसमी वापरास आयोगाचे लागू असलेले वीज दराचे आदेश लक्षांत घेऊन त्यानुसार विजेचा वापर करण्याचे ठरविले आहे अशा इतर ग्राहकांचाही, समावेश होईल.

११.३ जर वितरण परवानाधारकास ग्राहकाला सेवा सुरु करताना त्याच्याकडून सुरक्षा अनामत हवी असेल तर ती वीज दराच्या वर्गवारीवर आणि ग्राहकाची करारांतर्गत मागणी/ मंजूर लोड फॅक्टर, डायव्हर्सिटी फॅक्टर व कामाच्या पाळ्यांची संख्या, यावर अंदाजित असेल.

११.४ वितरण परवानाधारक प्रत्येक आर्थिक वर्षांत एकदा ग्राहकांना देण्यांत आलेल्या प्रत्यक्ष देयकांच्या आधारे सुरक्षा रकमेची फेर-परिगणना करेल.

११.५ ग्राहकाने ठेवलेली सुरक्षा अनामतीची रक्कम, त्याने विनियम ११ नुसार ठेवावयास हव्या असणा-या सुरक्षेच्या रकमेपेक्षा जास्त असल्यास, सुरक्षा अनामतीची अशी जादा असलेली रक्कम वितरण परवानाधारक ग्राहकास एक रकमी परत करेल.

परंतु असे की, ज्या व्यक्तीने सुरक्षेची रककम भरलेली असेल तिने विनंती केल्यावर, आणि अशी व्यक्ती ग्राहक नसल्यास ग्राहकाला याबाबत सूचना देऊन, अशी विनंती प्राप्त झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आंत, अशा व्यक्तीच्या इच्छेप्रमाणे, पुढील देयकांत समायोजन करुन किंवा धनाद्वेशाद्वारे परत करेल.

परंतु आणखी असे की, परताव्याची रक्कम ग्राहकाने सुरक्षा अनामतीची जी रक्कम ठेवावयास पाहिजे त्या रकमेच्या दहा (१०) टक्क्याहून किंवा रु. तीनशेहून अधिक नसेल तर असा परतावा करण्याची गरज राहणार नाही.

११.६ जर विनियम ११.४च्या संदर्भात फेर-परिगाणना केलेली सुरक्षेची रक्कम ग्राहकाने ठेवलेल्या सुरक्षा अनामतीच्या रकमेपेक्षा जास्त असेल तर वितरण परवानाधारकाला ग्राहकाकडे अतिरिक्त सुरक्षेच्या रकमेची मागणी करण्याचा हक्क असेल.

परंतु असे की, अशा मागणीच्या संदर्भात अतिरिक्त सुरक्षा रकमेचा भरणा करण्यास कमीत कमी तीस (३०) दिवसा इतका कालावधी ग्राहकास देण्यांत येईल.

११.७ जर एखाद्या ग्राहकाने सुरक्षा अनामत भरल्यानंतर,पूर्व-भरणा केलेल्या मीटरच्याद्वारे वीज पुरवठा स्वीकारण्याचे ठरविले तर त्याची सुरक्षा अनमतीची रक्कम, ग्राहकाकडून येणे असलेल्या सर्व रकमांचे समायोजन करण्यांत आल्यावर अशा ग्राहकाला परत करण्यांत येईल किंवा ती, ग्राहकाच्या खात्यांत पूर्व-भरणा करण्यासाठी लागणा-या रकमेचा एक भाग असलेली जमा रक्कम म्हणून मानण्यांत येईल व त्यातून त्याच्या विजेच्या भावी वापरावरील खर्च कमी करण्यांत येईल.

११.८ अशा रितीने सुरक्षा अनामत म्हणून जमा करण्यांत आलेल्या कोणत्याही रकमेतून, ग्राहकाकडून देय असलेली किंवा देय होणारी कोणतीहि रक्कम, वितरण परवानाधारक वसूल करु शकेल.

११.९ वीज पुरवठा बंद केल्यावर, येणे असणा-या सर्व रकमांची वसूली झाल्यानंतर, वितरण परवानाधारक त्याच्याकडे उरलेली रक्कम ज्या व्यक्तीने ती भरली असेल तिला परत करेल व ती व्यक्ती ग्राहक नसल्यास त्याची सूचना ग्राहकास देईल.

११.१० जो ग्राहक

(१) जर त्याचा विजेचा वापर प्रती महिना एक लाख (१,००,०००) किलो-वॅट तासाहून कमी नसेल तर ; आणि

(२) अधिनियमाच्या कलम ५६ खाली जर तो वितरण परवानाधारकास कोणतीही निर्विवाद रक्कम देय नसेल तर,

त्याची इच्छा असेल तर, या विनियम ११ खालील सुरक्षा अनामत रोखीने, अनुसूचित व्यापारी बँकेने दिलेल्या रद्द न करता येण्याजोग्या पतपत्राने किंवा बिनशर्त बँक हमीद्वारे भरु शकेल.

११.११ ग्राहकाने सुरक्षा अनामत म्हणून रोखीने (धनादेश व बँक धनाकर्ष (ड्राफ्ट्स) धरुन) भरणा केलेल्या रकमेवर, भारतीय रिझर्व बँकेच्या बँक दराने वितरण परवानाधारक व्याज देईल.

परंतु असे की, या विनियम ११ खाली सुरक्षा अनामतीची म्हणून रोखीने ठेवलेली रक्कम जर रुपये पन्नास इतकी किंवा त्याहून जास्त असेल तर त्यावर असे व्याज देणांत येईल.

११.१२ ग्राहकाने रोख सुरक्षा अनामत ठेवल्याच्या दिनांकापासून वितरण परवानाधारकाने परताव्याची रक्कम पाठविल्याच्या दिनांकापर्यंत सुरक्षा अनामतीवर व्याज देय राहील.

## १२. पॉवर फॅक्टर / हार्मोनिक्स

१२.१ भारटीय विद्युत अधिनियम, १९५६ने ग्राहकाच्या भारासाठी विहीत केलेली सरासरी पॉवर फॅक्टरची पातळी, जी वितरण परवानाधारकाने, असल्यास, काही बदलाससह भारटीय विद्युत

अधिनियम, १९५६च्या कलम २७ खाली स्वीकारली आहे, त्या बदलाप्रमाणे व तसेच आयोगाने यासंबंधी दिलेल्या आदेशानुसार, संभाळणे ग्राहकावर बंधनकारक राहील.

परंतु असे की, उच्च-दाब ग्राहक अणि लघु-दाब ग्राहक ( फक्त औद्योगिक आणि व्यापारी) यांच्यावर त्यांच्या भाराच्या हार्मोनिक्सचे नियमन आयइइइ- एसटिडी ५१९-१९९२ ने विहीत केलेल्या पातळीवर व तसेच आयोगाने यासंबंधी दिलेल्या आदेशांनुसार करण्याचे बंधन राहील.

१२.२ वरील विनियम १२.१ मध्ये विहीत करण्यांत आलेल्या मानकांनुसार ग्राहकाच्या विद्युत संचमांडणीचा सरासरी पॉवर फॅक्टर वाढविण्यासाठी किंवा या संचमांडणीच्या हार्मोनिक्सचे नियमन करण्यासाठी वितरण परवानाधारक, ग्राहकास परिणामकारक उपाययोजना, तीन महिन्याहून कमी नसेल इतक्या कालावधीत, करण्यास सांगू शकेल.

परंतु असे की, वितरण परवानाधारक, आयोगाच्या संबधित आदेशांनुसार, ग्राहकास त्याच्या कमी/जास्त पॉवर फॅक्टरसाठी आणि हार्मोनिक्ससाठी त्यास दंड आकारेल किंवा प्रोत्साहन-अधिदान देईल.

## १३. वीज दराच्या वर्गीकरणानुसार ग्राहकांचे वर्गीकरण आणि पुनर्वर्गीकरण

वितरण परवानाधारक, आयोगाने मान्यता दिलेल्या वीज दराच्या विविध वर्गवारीत, ग्राहकांच्या वीज वापरानुसार ग्राहकांचे वर्गीकरण आणि पुनर्वर्गीकरण करेल.

परंतु असे की, वितरण परवानाधारक आयोगाने मान्यता दिलेल्या वीज दराच्या वर्गवारीखेरीज अन्य कोणतीहि वर्गवारी निर्माण करणार नाही.

## १४. मीटर्स

### १४.१ मीटरचा पुरवठा व किंमत

१४.१.१ ग्राहकाने जर मीटर खरेदी करण्याचे ठरविले तर ते वगळून इतर बाबतीत, वितरण परवानाधारक, अधिनियमाच्या कलम ४७च्या उप-कलम (१) च्या खंड (बी) अन्वये, ग्राहकास मीटरच्या किंमतीसाठी सुरक्षा अनामत भरण्यास सांगू शकेल.

परंतु असे की, कोणत्याही परिस्थितीत सुरक्षा अनामतीची रक्कम ही मीटरच्या किंमतीपेक्षा जास्त असणार नाही.

परंतु असे की, भारतीय रिझर्व बँकेच्या बँक दराने, वितरण परवानाधारक, ग्राहकाने विनियम १४.१.१ खाली सुरक्षा अनामत म्हणून भरणा केलेल्या रकमेवर, व्याज देईल.

१४.१.२ ग्राहकाने मीटर भाड्याने घेतल्यास विनियम १८खाली मान्यता देण्यांत आलेल्या शुल्कांच्या अनुसूचीनुसार आकार लावण्यांत येईल.

१४.१.३ अधिनियमाच्या कलम ५५ मध्ये प्राधिका-याने नमूद केलेल्या तपशीलानुसार (specifications), ग्राहक वितरण परवानाधारकाकडून किंवा पुरवठादाराकडून अचूक मीटर्स खरेदी करु शकेल.

परंतु असे की, जोपर्यंत प्राधिकारी अधिनियमाच्या कलम ५५ खाली विनियम विनिर्दिष्ट करीत नाही तोपर्यंत वितरण परवानाधारकाने ठरवून दिलेल्या तपशीलानुसार मीटर्सची खरेदी ग्राहक करु शकतील.

परंतु आणखी असे की, ग्राहकाने जर वितरण परवानाधारकाशिवाय अन्य पुरवठादाराकडून मीटरची खरेदी करण्याचे ठरविले तर वितरण परवानाधारकाला मीटर बसविण्यापूर्वी त्याची अचूकता तपासण्याचा हक्क राहील.

परंतु असेही की, जे ग्राहक वितरण परवानाधारकाकडून मीटरची खरेदी करणार असतील ते अशी खरेदी वितरण परवानाधारकाकडून आयोगाने विनियम १८ खाली मान्यता दिलेल्या किंमतीस करतील.

१४.२ **हरवलेली / जळालेली मीटर्स**

१४.२.१ वितरण परवानाधारकाकडे मीटर हरवल्याची तक्रार करताना त्याबरोबर सबंधित पोलीस ठाण्यांत नोंदलेल्या प्राथमिक तक्रारीची (First Information Report (FIR)) एक प्रतहि जोडण्यांत येईल.

१४.२.२ अशा प्रकरणांत वीज पुरवठा तोडाण्यांत आला असल्यास नवीन मीटर बसविल्यानंतर, विनियम १८ने मान्यता देण्यांत आलेल्या मीटरची किंमत तसेच इतर उपकरणांची किंमत आणि आकारांच्या अनुसूचीमधील लागू होणा-या इतर कोणत्याहि आकारांचे व सुरक्षा अनामत ग्राहकाकडून भरणा करण्यांत आल्यानंतर, वीज पुरवठा पूर्ववत सुरू करण्यांत येईल.

परंतु असे की, मीटर हरविल्यामुळे ते ज्या काळांत नव्हते त्या काळांतील विज वापराचे अंदाजित आकार, वीज पुरवठा पूर्ववत सुरु करण्यांत आल्यानंतरच्या पुढील देयकांत समाविष्ट करण्यांत येईल.

१४.२.३ ग्राहकाच्या तक्रारीनंतर किंवा अधिकृत प्रतिनिधीच्या तपासणीमध्ये मीटर जळाले असल्याचे आढळून आल्यास, ते बदलण्यांत येईल आणि ग्राहकाला वीज पुरवठा पुर्ववत सुरू करण्यांत येईल.

परंतु असे की, वितरण परवानाधारक नवीन मीटरची किंमत ग्राहकाकडून वसूल करेल.

परंतु असे की, मीटर जळाल्यामुळे ते ज्या काळांत नव्हते त्या काळांतील विज वापराचे अंदाजित आकार, वीज पुरवठा पूर्ववत सुरु करण्यांत आल्यानंतरच्या पुढील देयकांत समाविष्ट करण्यांत येईल.

१४.२.४ मीटरचे हरवणे किंवा जळणे सोडल्यास, वितरण परवानाधारक वीज पुरवठा ग्राहकाला चालू असतानाच्या कालावधीत एकापेक्षा अधिक वेळा मीटरची किंमत वसूल करु शकणार नाही.

## १४.३ मीटरच्या नोंदी घेणे

एखाद्या ग्राहकाकरिता किंवा ग्राहकांच्या वर्गाकरिता आयोगाने विशिष्ट मंजूरी दिली नसेल तर मीटरच्या नोंदी घेण्याचे काम अधिकृत प्रतिनिधीकडून कृषी ग्राहकांच्या बाबतीत किमान तीन महिन्यांतून एकदा आणि इतर ग्राहकांच्या बाबतीत किमान दोन महिन्यांतून एकदा करण्यांत येईल.

## १४.४ मीटरची तपासणी व देखभाल

१४.४.१ वितरण परवानाधारक सर्व ग्राहकांच्या मीटरच्या नियतकालिक तपासणीस व देखभालीस जबाबदार राहील.

१४.४.२ आयोगाने विनियम १८ खाली मान्यता दिलेल्या तपासणी शुल्काचा भरणा करुन, ग्राहक वितरण परवानाधारकास मीटरच्या अचूकतेची तपासणी करण्यास विनंती करु शकेल;

परंतु असे की, आयोगाने मान्याता दिलेल्या सुविधा केंद्रावर मीटरची तपासणी करुन घेण्याची विनंती ग्राहक वितरण परवानाधारकास करु शकेल.

१४.४.३ ग्राहकाकडून मीटरच्या तपसणीसाठी करण्यात आलेल्या विनंतीच्या दिनांकापासून दोन महिन्याच्या कालावधीत तपासणी अहवालाची प्रत वितरण परवानाधारक ग्राहकास देईल.

१४.४.४ अधिनियमाच्या कलम ५५ खाली प्राधिकारी जोपर्यंत विनियम विनिर्दिष्ट करीत नाही तोपर्यंत, तपासणी करण्यांत आलेले मीटर भारतीय विद्युत नियम,१९५६ ने विहीत केलेल्या अचूकतेच्या मर्यादांच्या पलिकडे असल्याचे आढळून आल्यास, वितरण परवानाधारक ग्राहकाने भरलेला तपासणी आकार परत करेल आणि खाली विनियम १५.४ मध्ये विशेषपणे नमूद केल्यानुसार तपासणीच्या निष्कर्षांच्या आधारे देयकांचे समायोजन करेल.

## १५. देयके तयार करणे

### १५.१ देयके तयार करणे आणि सादरीकरण यांतील मधला काळ

१५.१.१ एखाद्या ग्राहकाकरिता किंवा ग्राहकांच्या वर्गाकरिता आयोगाने विशिष्ट मान्यता दिली नसेल तर पूर्व-भरणा केलेल्या मीटर्सच्याद्वारे विजेचा पुरवठा होत असलेले ग्राहक सोडून, शहरे व नगरांतील ग्राहकांना वितरण परवानाधारक प्रत्येक दोन महिन्यातून किमान एकदा आणि इतर सर्व ग्राहकांना किमान प्रत्येक तीन महिन्यातून किमान एकदा देयके पाठवेल.

### १५.२ देयकाचा तपशील

१५.२.१ अधिनियम, या विनियमांनी आणि आयोगाने विनियम १८ खाली मान्यता दिलेल्या आकारांच्या अनुसूचीनुसार ग्राहकाने वितरण परवानाधारकाला देयकाच्या कालावधीत देय असलेल्या व देय होणा-या सर्व आकारांचा, अनामतींचा, कर आणि शुल्कांचा समावेश ग्राहकाच्या देयकांध्ये असेल.

१५.२.२ ग्राहकाने विनंती केल्यास, वितरण परवानाधारक ग्राहकास देयकाच्या परिगणनेचे तत्व स्पष्ट करुन सांगेल.

१५.२.३ वितरण परवानाधारक आणि ग्राहक यांच्यांत जर अन्य समझोता झाला नसेल तर, देयक मराठी आणि/ किंवा इंग्रजीत असेल.

१५.२.४ देयकांत इतर बाबींबरोबरच खालील बाबींचाही समावेश असेल-

अ) ग्राहक क्रमांक आणि ग्राहकाचे नाव व पत्ता;
ब) पुरवठ्याच्या क्षेत्रांत असलेल्या वितरण परवानाधारकाच्या कार्यालयाचे नाव;
क) (१) पुरवठ्याचा प्रकार ( एक-फेज; तीन-फेज; लघु-दाब; उच्च-दाब);.
(२) करारांतर्गत मागणी / मंजूर भार;
ड) ग्राहकाची वर्गवारी (घरगुती, वाणिज्य इ.)
इ) मीटर क्रमांक;

फ) देयकाचा कालावधी ( दिनांकांचा उल्लेख करण्यांत यावा);
ग) मीटरमधील आधीच्या काळांतील नोंदी - देयकाचा कालावधी/चक्र दिनांकासह;
ह) मीटरमधील चालू नोंद- देयकाचा कालावधी/चक्र दिनांकासह;
ई) मीटरचा फॅक्टर;
ज) देयकाच्या कालावधीत वापरण्यांत आलेल्या युनिट्सची (जसे,kWh, RkVAh / kVArh, kVAh इ) संख्या आणि जेथे आकारांच्या निश्चितिकरणासाठी गरज असेल तेथे देयकाच्या कालावधीत दिवसाच्या वेगवेगळ्या वेळांच्या भागांत वापरण्यांत आलेल्या युनिट्सची संख्या;
ख) देयक कालावधीतील कमाल मागण्या;
ल) देयक कालावधीतील सरासरी पॉवर फॅक्टर;
म) गेल्या सहा महिन्यातील वापर;
न) देयकाचा दिनांक आणि भरणा करण्याचा देय दिनांक;
घ) देयक तयार करण्याचा तपशील- चालू महिन्याची देयकाची रक्कम आणि मागील थकबाकी देयकांत दाखविण्यांत येतील;
प) सुरक्षा अनामत तपशील;
च) लागू असणा-या वीज दरांचे वेगवेगळे घटक दाखविणारा तक्ता;
र) अधिनियमाच्या कलम ६५ खाली अनुदानाचा, काही असल्यास, तपशील;
स) भरणा करण्याची रीत आणि वसूलीची केंद्रे;
त) ग्राहक सेवा केंद्राचा दूरध्वनी क्रमांक आणि पत्ता जेथे ग्राहक देयकासंबंधी तक्रार करु शकेल;
य) ग्राहक गा-हाणे निवारण विनियमाखाली स्थापन करण्यांत आलेल्या मंचाचा दूरध्वनी क्रमांक व पत्ता;
व) धनादेश आणि बँक धनाकर्ष (ड्राफ्ट्स) कोणत्या प्राधिका-याच्या नांवे काढावयाचे ते नांव नमूद करण्यांत यावे;

१५.२.५ अधिनियमाच्या कलम ५६ खाली वीज जोडणी तोडण्याची नोटीस ग्राहकाला अधिनियमाच्या कलम १७१ खाली तरतूद करण्यांत आलेल्या पध्दतीनुसार बजावण्यांत येईल.

परंतु असे की, कलम ५६ खाली देय असणारी कोणतीही रक्कम किंवा कोणताही आकार अदा करण्यास जर ग्राहक दुर्लक्ष करेल तरच अशी नोटीस बजावण्यांत येईल .

परंतु आणखी असे की, अशी नोटीस स्वतंत्रपणे बजावण्यांत येईल व ती देयकाचा एक भाग असणार नाही.

## १५.३ मीटरच्या नोंदी नसताना देयके तयार करणे

१५.३.१ जर कोणत्याहि कारणामुळे मीटरपर्यंत पोहोचणे शक्य झाले नसेल तर आणि त्यामुळे नोंदी घेतल्या नसतील तर वितरण परवानाधारक ग्राहकास अंदाजित देयक पाठवेल.

परंतु असे की, अशा रितीने भरणा करण्यांत आलेली रक्कम, नंतरच्या देयकाच्या कालावधीच्या मीटरच्या नोंदी घेण्यांत आल्यावर ती, समायोजित करण्यांत येईल.

१५.३.२ जर लागोपाठच्या दोन प्रयत्नानंतर मीटरपर्यंत पोहोचणे शक्य न झाल्याने मीटरच्या नोंदी घेतल्या गेल्या नसतील तर, अधिनियमाच्या कलम १६३ नुसार वितरण परवानाधारकास जो मार्ग उपलब्ध असेल त्याशिवाय, ग्राहकावर सात पूर्ण कामाच्या दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीची नोटीस बजावण्यांत येऊन त्यांत नमूद केलेल्या दिवशी मीटरच्या नोंदी घेण्यासाठी जागा उघडी ठेवण्यास त्यास सांगण्यांत येईल.

परंतु असे की, अधिकृत प्रतिनिधी मीटरच्या नोंदी घेण्यासाठी कोणत्या वेळेस येईल ती वेळ देखील नोटीशीमध्ये नमूद करण्यांत आली असेल.

१५.३.३ जर १५.३.२ मधील नोटीशीमध्ये नमूद करण्यात आलेल्या दिवशी आणि वेळेस ग्राहक प्रवेश देऊ शकला नाही तर, अधिनियमाच्या कलम १६३च्या उप-कलम (३) मधील तरतुदींनुसार त्याचे हे वागणे म्हणजे प्रवेशास नकार मानण्यांत येईल आणि याचे परिणामस्वरुप म्हणून पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

१५.३.४ अधिनियमाच्या तरतुदींना बाधा येऊ न देता, ग्राहकाने जर वितरण परवानाधारकास मीटरच्या जागेत प्रवेश तात्पुरता शक्य नसल्याचे सयुक्तिक कारणांसह पूर्व-सूचना देऊन कळविले असेल आणि विनियम १५.६ नुसार आगाऊ भरणा करण्याची सुविधा मागितली असेल तर, विनियम १५.३.३ मधील काहीही लागू होणार नाही.

१५.३.५ या विनियम १५.३च्या प्रयोजनार्थ, वितरण परवानाधारकाने मागील देयक चक्रातील विजेच्या वापराच्या घेतलेल्या नोंदीच्या आधारे अंदाजित देयकाची परिगणाना करण्यांत येईल.

**१५.४ मीटर सदोष असताना देयके तयार करणे**

१५.४.१ अधिनियमाच्या भाग १२ आणि भाग १४ मधील तरतूदींना अधीन राहून,मीटर सदोष असेल तर, तपासणी अहवालाच्या निष्कर्षानुसार तयार करण्यांत आलेले देयक व त्यासोबत तपासणी अहवाल पाठविण्यांत आला असेल तर, मीटर सदोष अस्दल्याचे ज्या महिन्यांत निदर्शनास आले असेल त्या महिन्याच्या मागील जास्तीत जास्त ३ महिन्यांच्या कालावधीतील ग्राहकाच्या देयकाची रक्कम समायोजित करण्यांत येईल.

परंतु असे की, मीटरची मोहोर तुटलेली किंवा त्यास हानी पोचली असल्यास, मीटरमधील दोषाची अथवा बिघाडाची तपासणी करण्यांत येईल. मीटर सदोष असल्यास, वरील खंड १५.४.१ नुसार आणि ते बिघडवले गेले असल्यास अधिनियमाच्या कलम १२६ किंवा १३५ नुसार, प्रत्येक प्रकरणी त्यातील परिस्थितीवर अवलंबून, आकार निर्धारण करण्यांत येईल.

परंतु आणखी असे की, मीटरमध्ये नोंदी घेणे थांबले गेले असल्यास , ज्या महिन्यांत नोंदी घेणे थांबले गेले असेल त्याच्या मागील जास्तीत जास्त ३ महिन्यापर्यंत ,ज्या महिन्याचे देयक तयार करण्यांत येणार आहे त्या महिन्यामागील बारा महिन्यांत मीटरवर नोंदल्या गेलेल्या विजेच्या सरासरी वापरावर आधारित, ग्राहकाचे देयक तयार करण्यांत येईल.

**१५.५ देयकांचा भरणा**

१५.५.१ देयके भरणा करण्याचा देय दिनांक देयकांत दाखविण्यांत येईल आणि निवासी आणि कृषी ग्राहकांच्ह्या बाबतीत तो देयकाच्या दिनांकापासून, एकवीस दिवसांपेक्षा कमी असणार नाही आणि इतर ग्राहकांच्या बाबतीत पंधरा दिवसांहून कमी असणार नाही.

१५.५.२ जर ग्राहकास देयक मिळाले नाही किंवा देयक मिळाल्यानंतर त्याने जर ते हरविले असेल तर पुढील देयक प्राप्त होण्याच्या आधी तो ही बाब, वितरण परवानाधारकाने अशा तक्रारींकडे लक्ष देण्यासाठी निर्देशीत केलेल्या अधिका-यास, कळवेल.

१५.५.३ ग्राहक जेव्हा निर्देशीत अधिका-याची व्यक्तिशः भेट घेईल तेव्हा निर्देशीत अधिकारी, ग्राहकाच्या ओळखीची पडताळणी केल्यानंतर, लगेच ग्राहकाला देयकाची रक्कम आणि देयाकभरणा करण्याचा देय दिनांक सांगेल आणि ज्या दिवशी ग्राहकाने देयक न मिळाल्याचे किंवा हरविल्याचे, जसे असेल तसे, कळविले असेल त्या दिवसापासून तीन दिवसांच्या आंत देयकाची दुसरी प्रत ग्राहकास मिळण्याची व्यवस्था करेल;

परंतु असे की, जर ग्राहकाने देयक न मिळाल्याचे किंवा हरविल्याचे निर्देशीत अधिका-यास दूरध्वनीवर कळविले तर, त्याच्या ओळखीची योग्य ती पडताळणी केल्यानंतर निर्देशीत अधिकारी देयकाची रक्कम त्यास दूरध्वनीवर संगेल;

परंतु आणखी असे की, देयक न मिळाल्यामुळे किंवा हरविल्यामुळे, देय दिनांकाच्या आंत, देयकाच्या रकमेचा भरणा करण्याच्या जबाबदारीतून ग्राहकाची सुटका होणार नाही.

१५.५.४ जो ग्राहक देयाकाची रक्कम भरणा करण्याकडॆ दुर्लक्ष करेल त्याच्यावर आयोगाच्या संबंधित आदेशानुसार विलंब भरणा आकार आणि व्याज आकारण्यांत येईल, सुरक्षा अनामतीचे विनियोजन (appropriation)करण्यांत येईल आणि/ किंवा अधिनियम आणि या विनियमांतील तरतुदींनुसार वीज जोडणी तोडण्यांत येईल.

१५.५.५ वितरण परवानाधारक देयकाची रक्कम तत्परतेने किंवा लवक्र अदा करणा-या ग्राहकांना, आयोगाच्या संबध्गित आदेशानुसार प्रोत्साहन-अधिदान देईल.

**१५.६ आगाऊ भरणा**

१५.६.१ वितरण परवानाधारक ग्राहकाला पुरविण्यांत येणा-या विजेचा आकार आगाऊ भरणा करण्याची सुविधा देईल.

१५.६.२ वरील विनियम १५.६.१ नुसार आगाऊ भरणा केल्यानंतर, वितरण परवानाधारक ग्राहकाला आगाऊ म्हणून जमा असलेल्या रकमेची पावती देईल.

१५.६.३ ग्राहकाने भरणा केलेल्या रकमेवर, भारतीय रिझर्व बँकेच्या बँक दराने वितरण परवानाधारक व्याज देईल.

**१५.७ देयकांच्या थकबाकीचा हिशोब पुरा करणे**

१५.७.१ वितरण परवानाधारक, थकबाकीचा भरणा हप्त्याहप्त्याने करण्याची सुविधा ग्राहकांना स्वतःहून देईल

परंतु असे की, थकबाकीची परतफेड हप्त्याहप्त्याने करण्याची सुविधा जरी देण्यांत आली तरी जोपर्यंत सर्व थकबाकीची परतफेड करण्यांत येत नाही तोपर्यंत, त्यामुळे आयोगाने वेळोवेळी दिलेल्या संबधित आदेशानुसार, ग्राहकांच्या व्याज आणि, अतिरिक्त विलंब आकार भरणा करण्याच्या जबाबदारीवर परिणाम होणार नाही.

## १६. वीजेचा पुरवठा पुर्ववत सुरु करणे

१६.१ अधिनियमाच्या आणि या विनियमांखाली असणा-या त्याच्या जबाबद-यांची पूर्तता ग्राहक न करु शकल्यामूळे जर वितरण परवानाधारकाने ग्राहकाचा वीज पुरवठा तोडला असेल ते ग्राहक वगळून इतर प्रकरणी ग्राहकाला वीज पुरवठा पूर्ववत सुरू करण्याचा येणारा खर्च वितरण परवानाधारक सहन करेल.

१६.२ जर एखाद्या गा-हाण्यांत किंवा वादांत समझोता झाल्यानंतर वीज पुरवठा पूर्ववत सुरु करण्याचा खर्च ग्राहकाने सहन करावयाचा असेल तर आयोगाने विनियम १८ खाली मान्यता दिली आहे अशा आकारांचा ग्राहकाने भरणा केल्यानंतर वितरण परवानाधारक वीज पुरवठा पुर्ववत सुरु करेल.

परंतु असे की, वितरण परवानाधारक असे आकार रोखीने किंवा बँक धनाकर्षाने (ड्राफ्ट्स) भरण्यास ग्राहकास सांगू शकेल.

## १७. वीज पुरवठ्यांत बिघाड

१७.१ चक्रिवादळ, पूर, वादळ आणि त्याच्या नियंत्रणाबाहेरील इतर घटना वगळता वितरण परवानाधारक ग्राहकाला विजेचा अखंडीत , दर्जेदार आणि भरवशाचा पुरवठा होत राहण्यासाठी सर्व वाजवी उपाय योजेल.

१७.२ तपसणी करण्यासाठी किवा देखभालीसाठी किंवा वीज पुरवठा कार्यक्षमतेने व्हावा म्हणून अन्य कोणत्याहि पुरेशा कारणासाठी, आवश्यक असेल तितक्या कालावधीकरिता, विजेचा पुरवठा तात्पुरत्या स्वरुपांत बंद ठेवण्याचा वितरण परवानाधारकाला हक्क असेल परंतु त्यासाठी त्याने जनतेला आगाऊ सूचना देणे आवश्यक आहे.

१७.३ या विनियम १७ मध्ये नमूद केलेल्या परिस्थितीत किंवा अटीखाली वीज पुरवठ्यांत कपात केल्यामुळे संविदा, अपकृति, हमी, नेमके दायित्व किंवा कोणत्याहि कायद्यांतून निर्माण होणा-या अप्रत्यक्ष, परिणामस्वरुप, आनुषंगिक, दंडात्मक, उदाहरणीय नुकसान, फायद्यांतील किंवा संधीची हानि, यासंबंधीच्या कोणत्याहि दाव्यास वितरण परवानाधारक जबाबदार राहणार नाही.

## १८. आकारांची अनुसूची

१८.१ प्रत्येक वितरण परवानाधारक, हे विनियम अधिसूचित करण्यांत आल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, या विनियमांत असलेल्या बाबींच्या व ज्या बाबींच्या संदर्भात, अधिनियम आणि या विनियमाखाली ग्राहकांना विजेचा पुरवठा करताना वितरण परवानाधारकाने

त्याच्यावरील जबाबदार-यांची पुर्तता करावयाची आहे अशा बाबींकरिता वितरण परवानाधारक आयोगाच्या मान्यतेसाठी आकारांची अनुसूची सादर करेल.

परंतु असे की, अधिनियमाच्या कलम ६४ खाली विजेच्या दराच्या निश्चितिकरणाच्या प्रत्येक प्रस्तावासोबत वितरण परवानाधारक आकारांची अनुसूची आयोग सांगेल त्या तपशीलासाह सादर करेल.

१८.२ वितरण परवानाधारकाने विनियम १८.१ खाली सादर केलेल्या आकरांच्या अनुसूचीची तपासणी केल्यावर आयोग-

(अ) त्यास आपली मान्यता, आदेशांत नमूद केलेल्या बदल आणि अटीसह, कळवेल; किंवा

(ब) आकाराची अनुसूची जर अधिनियमांतील आणि/ या विनियमांतील तरतुदींना अनुसरुन नसेल तर त्यास सादर करण्यांत आलेली आकारांची अनुसूची, त्यासंबंधीची कारणे लेखी नोंदवून, नामंजूर करेल.

परंतु असे की, वितरण परवानेधारकाने सादर केलेली आकारांची अनुसूची मंजूर, बदल करण्यापूर्वी किंवा ती नाकारण्यापूर्वी आयोग सर्व हितसंबंधितांच्या मतांवर उचित विचार करेलः

परंतु पुढे असे की, आयोग प्रत्येक वितरण परवाना धारकासाठी आकारांची अनुसूची मंजूर करेल किंवा एका वर्गातील वितरण परवानाधारकांना किंवा राज्यातील सर्व वितरण परवानाधारकांना लागू करावयाची आकारांची अनुसूची निश्चित करेलः

परंतु असेही की, आयोगाने मान्यता दिलेली आकारांची अनुसूची, त्यांत जोपर्यंत सुधारणा करण्यांत येत नाही किंवा ती रद्द करण्यात येत नाही तोपर्यंत, आयोगाने दिलेल्या मंजूरीच्या आदेशांत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत अंमलांत राहील.

१८.३ आयोगाने मान्यता दिलेल्या आकारांच्या अनुसूचीत कोणताहि बदल केवळ आयोगाच्या पूर्व-मंजूरीनेच करण्यात येईल.

१८.४ वितरण परवानाधारकाने विनियम १८.१ खाली सादर केलेल्या आकारांच्या अनुसूचीला आयोग जोपर्यंत मंजूरी कळवीत नाही तोपर्यंत वितरण परवानाधारकाची सध्याची आकारांची अनुसूची अंमलांत राहील.

## १९ वीज पुरवठ्याच्या अटी व शर्ती

१९.१ वितरण परवानाधारकाच्या अटी व शर्ती वीज पुरवठ्याच्या अटी व शर्ती मध्ये असो आणि / किंवा कोणत्याहि परिपत्रक, आदेश, अधिसूचना किंवा इतर कोणत्याही दस्तऐवजांत किंवा पत्रांत असो, या विनियमांशी त्या विसंगत असतील तर ज्या दिवशी हे विनियम अंमलांत येतील त्या दिवसापासून त्या अवैध असल्याचे मानण्यांत येईल.

१९.२ वितरण परवानाधारक, ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासंबंधीच्या वीज पुरवठ्याच्या अटी व शर्ती आणि सर्व परिपत्रके, आदेश, आणि इतर दस्तऐवज किंवा पत्रे या विनियमांशी ती

सुसंगत व्हावीत म्हणून त्यांत, या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या कालावधीत, बदल करेल किंवा ती अद्यावत करेल.

परंतु असे की, या विनियमांच्या अधिसूचनेपासून चार महिन्यांच्या शेवटी, प्रत्येक वितरण परवानाधारक अशा रितीने बदल किंवा अद्यावतीकरण करण्यांत आले असल्याचे, सोबत वीज पुरवठ्याच्या सुधारित अटी व शर्तीची प्रत पाठवून, आयोगास कळवेल.

परंतु आणखी असे की, ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासंबंधीची सध्या अस्तित्वांत असलेली कोणतीहि परिपत्रके, आदेश, आणि इतर दस्तऐवज किंवा पत्रे यांमध्ये, या विनियम १९.२ नुसार, जर बदल किंवा ती अद्यावत करण्यांत आली नाहीत तर ती, या विनियमांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या शेवटी, अवैध मानण्यांत येतील.

१९.३ वितरण परवानाधारकाने सादर केलेल्या वीज पुरवठ्याच्या अटी व शर्तीचे पुर्नविलोकन केल्यानंतर आयोगाच्या मते त्यांतील कोणताहि खंड जर अधिनियमांतील किंवा या विनियमांतील तरतूदींशी विसंगत असेल तर त्यांत सुधारणा किंवा बदल करण्याचे निदेश आयोग वितरण परवानाधारकास देऊ शकेल.

## २० वीज पुरवठा संहिता आणि आकाराच्या अनुसूचीची तरतूद

प्रचलित असलेल्या या विनियमांची, वीज पुरवठ्याबाबतच्या वितरण परवानाधारकाच्या अटी व शर्ती व मान्यताप्राप्त आकारांच्या अनुसूचीची देण्याची जबाबदारी वितरण परवानाधारकावर राहील -

(१) नवीन जोडाणीसाठी अर्ज करणा-या प्रत्येक अर्जदाराला, त्याचा अर्ज स्वीकृत झाल्यानंतर.

(२) वितरण परवानाधारकाच्या ग्राहकांना, त्यांनी विनंती केल्यावर.

(३) इंटरनेटवरील त्याच्या वेब-साइटवर प्रत काढून घेता येईल अशा नमुन्यांत (downloadable format) उपलब्ध करुन देऊन.

## २१. अर्थनिश्चिती

हे विनियम अधिनियमातील तरतुदींना व विद्युत पुरवठ्यासंबंधीच्या लागू असणा-या सध्या अंमलांत असलेल्या इतर कोणत्याही कायद्यांना सर्व दृष्टीने अधीन असल्याचे मानण्यांत येईल.

## २२. आदेश व निदेश देणे

या विनियमांची अंमलबजावणीसंबंधी, अधिनियमातील तरतूदीना अधीन राहून, आयोग वेळोवेळी आदेश व निदेश देऊ शकेल.

## २३. बदल करण्याचे अधिकार

आयोग, कोणत्याही वेळी, या विनियमांतील कोणत्याहीह तरतूदीमध्ये बदल, फेरबदल किंवा सुधारणा करु शकेल.

## २४.	अडचणी दूर करण्याचे अधिकार

या विनियमांतील कोणत्याही तरतूदीची अंमलबजावणी करताना जर काही अडचणी आल्या तर आयोग, साधारण किंवा विशेष आदेशाने, अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक असेल अशी, अधिनियमांतील तरतुदींशी विसंगत नसणारी, तरतूद करु शकेल.

**ए. एम. खान**
**सचिव,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**मुंबई,**
**दिनांक, २० जानेवारी, २००५**

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी) विनियम, २००५**

| अनुक्रमणिका | | |
|---|---|---|
| अ.क्र | तपशील | पान क्र. |

| | | |
|---|---|---|
| १ | शीर्षक | १ |
| २ | व्याख्या | १ |
| ३ | आकारांची वसूली | ४ |
| | ३.३  वीज पुरवठा करण्यासाठी झालेल्या खर्चाची वसूली | ५ |
| | ३.४  वीज पुरवठ्याचा आकार | ७ |
| ४ | वीज पुरवठ्यासाठी अर्ज | ७ |
| ५ | अर्जाची छाननी | ९ |
| ६ | करार | ११ |
| ७ | वितरण परवानाधारकाच्या मालमत्तेची देखभाल करणे | १२ |
| ८ | ग्राहकाच्या जागेत प्रवेश | १३ |
| ९ | ग्राहकाच्या जागेचे वायरिंग करणे | १४ |
| १० | नावातील बदल | १४ |
| ११ | सुरक्षा अनामत | १५ |
| १२ | पॉवर फॅक्टर/ हार्मोनिक्स | १७ |
| १३ | वीज दराच्या वर्गीकरणानुसार ग्राहकाचे वर्गीकरण आणि पुर्नवर्गीकरण | १८ |
| १४ | मीटर्स | १८ |
| | १४.१  मीटरचा पुरवठा व किंमत | १८ |
| | १४.२  हरवलेली/ जळालेली मीटर्स | १९ |
| | १४.३  मीटरच्या नोंदी घेणे | १९ |
| | १४.४  मीटरची तपासणी व देखभाल | १९ |
| १५ | देयके तयार करणे | २० |
| | १५.१  देयके तयार करणे आणि सादरीकरण यांतील मधला काळ | २० |

| | | |
|---|---|---|
| | १५.२ देयकाचा तपशील | २० |
| | १५.३ मीटरच्या नोंदी नसताना देयके तयार करणे | २१ |
| | १५.४ मीटर सदोष असताना देयके तयार करणे | २२ |
| | १५.५ देयकांचा भरणा | २२ |
| | १५.६ आगाऊ भरणा | २३ |
| | १५.७ देयकाच्या थकबाकीचा हिशोब पुरा करणे | २३ |
| १६ | वीज पुरवठा पुर्ववत सुरू करणे | २४ |
| १७ | वीज पुरवठ्यांत बिघाड | २४ |
| १८ | आकारांची अनुसूची | २४ |
| १९ | वीज पुरवठ्याच्या अटी व शर्ती | २५ |
| २० | वीज पुरवठा संहिता आणि आकारांच्या अनुसूचीची तरतूद | २६ |
| २१ | अर्थनिश्चिती | २६ |
| २२ | आदेश व निदेश देणे | २६ |
| २३ | बद्ल करण्याचे अधिकार | २६ |
| २४ | अडचणी दूर करण्याचे अधिकार | २७ |